# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.८६६३/२१/अ.क्र.५८५३/२४/०१**
**श्री. संजय भगवान वाडेकर**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) सी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
सी विभाग यांचे कार्यालय,७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी , मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ००२.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
सी विभाग यांचे कार्यालय,७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी , मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ००२.
**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.०६.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०३.२०२१ | २३.०४.२०२१ | ०१.०६.२०२१ | २१.०६.२०२१ |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.२३.०४.२०२१ रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. २१.०६.२०२१ रोजीचे आदेश संलग्न करुन दि.२९.०७.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपीलार्थी यांनी दिनांक ३०.०३.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार Please Issue me the NOC given by your department for removal of electric street light poles. No. SGM-34/1 to 34/5 as per mentioned in the NOC enclosed given by Asstt. Engg (SWM) C Ward bearing no. AC/C/A E. (SWM)/8025 dt. 27.10.2020 याबाबत माहितीची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक २३.०४.२०२१ नुसार अपिलार्थी यांना कळविले आहे की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध नाही. सदर माहिती (SWM) सी विभाग यांच्याशी संबधित असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी".

जन माहिती अधिकारी यांचेकडून मागितलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०६.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केला. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी २१.०६.२०२१ रोजी सुनावणी घेऊन "जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन जर माहिती

उपलब्ध झाल्यास अपीलार्थीस ७ दिवसांत विनामुल्या देण्यात यावी", असे आदेश पारित करुन प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

अभिलेखावरुन असे स्पष्ट होत नाही की, अपीलार्थीस प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर माहिती देण्यात आली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०१.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Maharashtra

प्रदीप व्यास 19-11-2024

**मुंबई** **( डॉ.प्रदीप व्यास )**
**दिनांक :१९.११.२०२४** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**